# महाराष्ट्र शासन

## राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

मुख्य कार्यालय : ३०५, शासकीय तंत्र निकेतन इमारत, खेरवाडी, अलीयावर जंग मार्ग, वांद्रे (पुर्व), मुंबई ४०० ०५१
क्षेत्रिय कार्यालय : सीईटी सेल, शासकीय दंत महाविद्यालया समोर, सेंट जॉर्ज रुग्णालय आवार, फोर्ट, मुंबई ४०० ००१.
: सीईटी सेल, तंत्रशिक्षण संचालनालय, ३, महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१

ई-मेल : maharashtra.cetcell@gmail.com वेबसाईट :www.mahacet.org


क्र.राज्य सीईटी कक्ष/एमएच-सीईटी२०१६/बीएएमएस व इतर/रिक्त जागा/नोटीस क्रमांक-५५/५६७/ दिनांक:२४/१०/२०१६.

## एमएचटी-सीईटी-२०१६ – नोटीस

**शासकीय/ महानगरपालिका, शासन अनुदानित आणि विनाअनुदानित बी.ए.एम.एस./ बी.यु.एम.एस./ फिजीओथेरेपी/ बी.एच.एम.एस./ ऑक्युपेशनलथेरपी/ बीएएसएलपी/ बी. (पी.ॲन्ड ओ.) /बी.एसस्सी. नर्सिंग महाविद्यालये-प्रवेश प्रक्रिया**

**उपरोक्त आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांच्या संबंधित महाविद्यालयांची एकत्रित निवड यादी दिनांक २४ ऑक्टोबर, २०१६ रोजी संचालनालयाच्या "www.dmer.org" या संकेतस्थळावर प्रसिध्द् करण्यात येत आहे. सदर यादीमधील निवड झालेल्या उमेदवारांना महाविद्यालयात रुजू होण्याकरिता आणि स्टेटस् रिटेंन्शन अर्ज सादर करण्याकरिता दिनांक २७ ऑक्टोबर, २०१६ हा अंतिम दिनांक देण्यात येत आहे.**

उपरोक्त अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयातील दिनांक २७ ऑक्टोबर, २०१६ दुपारी ३.०० नंतर रिक्त राहिलेल्या प्रवर्गनिहाय जागांवर एमएचटी-सीईटी-२०१६ च्या नियमानुसार संबंधित महाविद्यालयांमार्फत प्रवेश केले जातील. संबंधित महाविद्यालये व उमेदवारांनी प्रवेशासंबंधी खालील दर्शविलेल्या वेळापत्रकाची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | तपशील | वेळापत्रक |
|---|---|---|
| १. | महाविद्यालयनिहाय रिक्त जागांचा तक्ता संचालनालयाच्या वेबसाईटवर उपलब्ध राहील. (www.dmer.org) | २७/१०/२०१६ (रात्री १०.०० नंतर) |
| २. | विद्यार्थी व्यक्तीशः अथवा त्यांचे पालक यांनी त्यांना हव्या असलेल्या महाविद्यालयात प्रवेशासाठी अर्ज करावयाचा कालावधी. (एमएच-सीईटी-२०१६ च्या ऑनलाईन गुणपत्रिका आणि सर्व आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या छायाप्रतींसह) | २८/१०/२०१६ (सकाळी १०.०० ते दुपारी ३.०० पर्यंत) |
| ३. | महाविद्यालयाने त्यांचेकडे प्राप्त झालेल्या अर्जांमधून गुणवत्ता यादी तयार करुन ती महाविद्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रकाशित करणे आणि रिक्त जागांच्या अनुसार निवडयादी प्रसिध्द करणे. | **२८/१०/२०१६** (सायंकाळी ०६.०० वाजता) |
| ४. | निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात रुजू होण्याचा दिनांक. | २९/१०/२०१६ (सकाळी १०.०० पासून) |
| ५. | सदर मुदतीनंतर रिक्त राहीलेल्या जागावर दिनांक २८/१०/२०१६ रोजीच्या गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेश देणे. प्रवेशाचे वेळी विद्यार्थ्यांकडे सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे आणि शैक्षणिक शुल्क असणे आवश्यक आहे. | ३०/१०/२०१६ (सकाळी १०.०० ते दुपारी २.०० पर्यंत) |
| ६. | २८/१०/२०१६ रोजीची प्रतिक्षा यादी संपल्यानंतर पात्र व उपस्थित उमेदवारांना गुणवत्तेनुसार प्रवेश देण्याची प्रक्रिया (Spot Admission Round) | ३०/१०/२०१६ (दुपारी ३.०० नंतर) |
| ६. | **प्रवेशाचा अंतिम दिनांक** | **३१ ऑक्टोबर, २०१६** |

विद्यार्थ्यांचे पात्रता निकष व नियम हे एमएच-सीईटी-२०१६ च्या आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या नियमावली (एमएच-सीईटी २०१६ सामाईक प्रवेश परीक्षा नियमावली पुस्तिका आणि पसंतीक्रम अर्ज माहितीपुस्तिका) पुस्तिकांप्रमाणे राहतील. उपरोक्त महाविद्यालयांनी वर नमूद केलेल्या सूचना आणि वेळापत्रकाप्रमाणे कार्यवाही करणे बंधनकारक आहे.

**टिप :**

- या नोटीशीतील वेळापत्रका प्रमाणे प्रवेशाचे अधिकार हे या कार्यालयातर्फे दिनांक २४/१०/२०१६ रोजी प्रसिध्द केलेल्या निवड यादीमध्ये समाविष्ठ असलेल्या महाविद्यालयानांच आहेत.
- या कार्यालयातर्फे दिनांक २४/१०/२०१६ रोजी जाहिर झालेल्या निवड यादी मध्ये **समाविष्ठ नसलेल्या** महाविद्यालयांना हि नोटीस व वेळापत्रक लागू नाही. तरी अशा उर्वरीत महाविद्यालयांनी प्रवेशाबाबत या कार्यालयाची पूर्वपरवनगी घेऊनच निवड प्रक्रिया राबवावी.
- वरिल नमूद केलेल्या निकषांप्रमाणे महाविद्यालय पात्र आहे अशी खातरजमा करुनच उमेदवारांनी प्रवेश घ्यावा.
- वरिल नोटीशीनुसार आखून दिलेल्या वेळापत्रकाची सर्व संबंधीत महाविद्यालये, उमेदवार व पालक यांनी नोंद घ्यावी.

सही/-
(चंद्रशेखर व्ही. ओक) भाप्रसे
**सक्षम प्राधिकारी तथा आयुक्त,**
**राज्य सीईटी कक्ष, महाराष्ट्र राज्य,**
**मुंबई**